**सह दिवाणी न्यायालय, तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग परंडा यांचे न्यायालयात**

**नि.फौ.ख.क्र. ९१/२०१४.** **निशाणी क्र.९५**

**सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ ची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव – बजरंग भगवान सुर्यवंशी,

वय – ६९ वर्षे,

व्यवसाय – वकील,

राहणार – डोमगाव ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद. ह.मु. समर्थनगर परंडा ता. परंडा जिल्हा उस्मानाबाद.

**सरतपासणी सहा. सरकारी वकील श्री.व्ही.एस.भादुले साहेब यांचे मार्फत –**

मी सन १९८२ पासुन परंडा न्यायालयात वकील म्हणुन व्यवसाय करीत आहे. दिनांक १२.०७.२०११ रोजी माझ्या कडे नरसु तुळशीराम नाईकवाडे रा. कुंभेफळ ता. परंडा हे पक्षकार आले होते. त्यांना सदर प्रकरणातील आरोपी क्र. १ ते ६ विरुध्द फिर्याद दाखल करायची होती. फिर्यादीच्या सांगण्याप्रमाणे मी फिर्याद तयार केली व फिर्यादीच्या सहया घेतल्या. मी सही केली. फिर्यादीने सही माझ्या समक्ष केली. फिर्याद फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३३/२०११ फिर्यादीने दाखल केली. फिर्यादीचे वतीने मला नियुक्त करण्यात आले. फिर्यादीतील मजकुर फिर्यादीने सांगितला व त्याप्रमाणे मी लिहिला. फिर्यादीस **निशाणी क्र. ९६** देण्यात येते.

**उलटतपास आरोपी क्र. १, २ व ४ तर्फे श्री. एन.व्ही.सुर्यवंशी वकील यांचे मार्फत –**

ज्या मयत व्यक्ती मार्फत खरेदीखत नोंदविले असे फिर्याद मध्ये नमुद आहे त्या

व्यक्तीचे नाव मी सांगु शकत नाही. वादग्रस्त खरेदीखता बद्दल ते कोणी कुणाच्या हक्कात लिहुन दिले हे मला आठवत नाही. मला फिर्यादीने फिर्याद दाखल करते वेळेस वादग्रस्त विक्रीपत्रा बद्दलचे पुरावे दिल्याचे आठवत नाही. मयत व्यक्तीचे मृत्युप्रमाणपत्र माझ्याकडे दिल्याचे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. १, २ व ४ तर्फे श्री. एन.व्ही.सुर्यवंशी वकील यांचा उलटतपास आरोपी क्र. ३ व ६ तर्फे श्री. एस.बी.देवकते वकील यांनी स्वीकारला.**

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DILIP GANGADHAR JAGTAP
Date: 2026.03.20 17:27:11 +0530

( दिलीप गं. जगताप )

दिनांक–२०.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, परंडा.